## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ११९/२०२४ नि. २३ वरील आदेश

( संदिप वेंगुर्लेकर विरुध्द नगरपंचायत कुडाळ व.२)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी यांनी कागदपत्र हजर करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

०२. वादी यांचे कथन असे की, प्रस्तुत दाव्याचे कामी महत्वाची कागदपत्रे हजर करीत आहोत तरी हजर करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर लेखी म्हणणे सादर केलेले नाही, परंतु त्यांनी युक्तीवाद करुन सदर अर्जास तोंडी हरकत घेतली आहे. त्यांनी असा युक्तीवाद केला की प्रतिवादी यांनी हजर केलेले कागदपत्रांपैकी काही कागद हे छायांकित प्रती असल्याने त्यास अभिलेखावर दाखल करुन त्यास निशाण क्रमांक देता येणार नाही. सबब, अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज वाचून पाहीला, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी ३० येथील फेरीस्तामध्ये अ.क्र. १ ते १३ कागदपत्र नमूद केले आहेत. परंतु, प्रत्यक्ष त्यामध्ये एकुण १२ कागदपत्र असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचे दस्तऐवज भारतीय पुरावा कायद्यानुसार प्रतिवादीने शाबीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेता येईल. त्यामुळे सदर दस्तास अभिलेखावर दाखल करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. नि.३० च्या फेरीस्तामधील कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.01.07 13:17:36 +0530

दिनांक– ०६/०१/२०२५ (प.रा.ढोरे )

ठिकाण– कुडाळ. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.